# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.२०/का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १३ फेब्रुवारी, २०१७

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व उपनगर वगळून)
सर्व महानगरपालिका आयुक्त.

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये प्रचार साहित्याच्या छपाई व प्रसिध्दीवर आयोगाच्या आदेशान्वये घालण्यात आलेल्या निर्बंधाबाबत स्पष्टीकरण.

संदर्भ :- १) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. एसईसी/१०९५/७७/९५/डेस्क-३, दि. २८/८/१९९५

२) राज्य निवडणूक आयोगाचे आदर्श आचारसंहितेबाबतचे क्र. रानिआ / नप-२०१६/ प्र.क्र.३१/का.६, दि. १४/१०/२०१६चे आदेश.

महोदय / महोदया,

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये प्रचारासाठी पोस्टर्स व पॅम्प्लेट ची छपाई व प्रसिध्दीवर आयोगाचे संदर्भांकीत दि. २८/८/१९९५ च्या आदेशान्वये काही निर्बंध घालण्यात आले आहेत. या आदेशातील तरतुदीनुसार प्रचारासाठी छापण्यात येणाऱ्या साहित्यावर मुद्रणालयाचे नाव, प्रकाशकाचे नाव, छापण्यात येणाऱ्या प्रतींची संख्या हा तपशील नमूद करणे आवश्यक आहे. मात्र प्रत्येक प्रतीवर प्रत क्रमांक नमूद करणे आवश्यक करण्यात आलेले नाही. तथापि, राज्य निवडणूक आयोगाने आदर्श आचारसंहितेबाबत दि. १४/१०/२०१६ रोजी निर्गमित केलेल्या आदेशातील भाग-३ मधील परिच्छेद ६ मध्ये आयोगाच्या दि. २८/८/१९९५ चा उल्लेख करण्यात आला असून, त्या आदेशानुसार प्रचारासाठी छापण्यात येणाऱ्या साहित्यावर प्रतीची संख्या, प्रत क्रमांक, मुद्रणालयाचे व प्रकाशकाचे नाव व पत्ता नमूद करणे आवश्यक आहे असे नमूद करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत

प्रचारासाठी छापण्यात येणाऱ्या साहित्यावर प्रत क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबत विचारणा करण्यात येत आहे.

२. याबाबत स्पष्ट करण्यात येते की, प्रचारासाठी छापण्यात येणाऱ्या साहित्याच्या प्रत्येक प्रतीवर प्रत क्रमांक नमूद करण्यासाठी आग्रह धरण्यात येऊ नये.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र